दै. गोदातीर दि. 06.02.2025

# किनवटमध्ये एकाच रात्री ३ दुकाने फोडणाऱ्या चोरट्यांचा पोलिसांनी लावला माग

## दीड लाखाचा मालही जप्त



**किनवट (प्रतिनिधी)** – शहराच्या अशोकस्तंभ परिसरातील ३ दुकाने मंगळवारी दि.४ फोडून अज्ञात चोरट्यांनी १ लाख ९४ हजारांचा मुद्देमाल लंपास केला होता. अवघ्या २४ तासांत पोलिसांनी चोरट्यांचा शोध घेत दीड लाखाचा मुद्देमालही हस्तगत केला.

किनवट शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच आहे. दि.१ फेब्रुवारी रोजी अज्ञात चोरट्यांनी पालिका परिसरातील शर्मा यांचे घर फोडून १ लाख ८० हजारांचा मुद्देमाल लांबविल्याची घटना ताजी असताना मंगळवारी रात्री ते बुधवारी पहाटेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी अशोकस्तंभ परिसरातील माजी नगरसेवक प्रवीण राठोड यांच्या मालकीचे श्री मेन्स वेअर हे दुकान चोरट्यांनी पाठीमागच्या बाजूने फोडले. चोरट्यांनी आधी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तोडले.त्यानंतर काचेच्या रॅकमध्ये विक्रीसाठी ठेवलेले महागडे कपडे व एक जुना वापरता १० हजारांचा मोबाईल, ३० हजारांचे सीसीटीव्ही असा एकूण १ लाख ९० हजाराचा मुद्देमाल लंपास केला. त्यानंतर चोरट्यांनी राठोड यांच्या शेजारी असलेले महेंद्र घुले यांचे इडली सेंटर व त्यांच्या बाजूला असलेले शुभम कावळे यांचेही गुरूवर्य ट्रेडिंग कंपनी हे आईसक्रिमचे दुकान फोडून चार्जर, चिल्लर पैसे असा ४ हजार रुपयांचा माल लंपास केला. बुधवारी सकाळी व्यापारी शुभम कावळे यांना चोरीचा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी बाजूच्या व्यापाऱ्यांना चोरीची कल्पना दिली.

याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूद्ध गुन्हा दाखल केला होता. चोरीसंदर्भात तपासिक फौजदार सागर झाडे यांना गुप्त खबऱ्यामार्फत चोरीचे धागेदोरे सापडले. त्यानंतर फौजदार झाडे यांनी पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, डीवायएसपी रामकृष्ण मळघणे, पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला, देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या गंगानगरमध्ये धाड टाकली. तेव्हा गंगानगर येथील दीपक साळुंखे व विष्णू मेटकर यांनी चोरीचा माल एका घरात ठेवल्याचे दिसून आले. झाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी एका घरातून दीड लाख रुपयांचे कपडे हस्तगत केले. पोलीस मागावर असल्याचा सुगावा लागताच दीपक साळुंखे व विष्णू मेटकर फरार झाले.

### व्यापाऱ्यांचे निवेदन, आज बैठक

शहरात चोऱ्यांचे सत्र सुरुच असल्याने व्यापाऱ्यांत दहशतीचे वातावरण आहे. वाढत्या चोऱ्यांमुळे व्यापारी पोलीस प्रशासनावर संतप्त आहेत. चोऱ्या रोखण्यासाठी कठोर पाऊले उचलावेत, अशी मागणी व्यापाऱ्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे केली आहे. निवेदनावर ४२ व्यापाऱ्यांच्या सह्या आहेत.दरम्यान, वाढत्या चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी दि.६ पोलिसांच्यावतीने व्यापाऱ्यांना सजग करण्याच्या दृष्टीने बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

### एटीएम चोरीतील चोरटे मोकाटच

अज्ञात चोरट्यांनी दि. २३ जानेवारी रोजी गोकुंद्याच्या एसबीआय बँकेचे एटीएम मशीन २१ लाख ४ हजार तीनशे रुपयांच्या रोकडसह लंपास केली. याप्रकरणाचा तपास नांदेडच्या एलसीबीकडे असल्याचे सांगण्यात येते. एटीएम चोरीच्या घटनेला १५ दिवस लोटूनही चोरटे अद्याप मोकाटच आहेत.